# International Webinar
on
“Recent Trends in Mathematics and its Applications”

लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात दिनांक ०९ - १२ नोव्हेंबर, २०२० दरम्यान गणित विभाग आणि IQAC तसेच Marathwada Mathematical Society यांच्या संयुक्त विद्यमाने “Recent Trends in Mathematics and its Applications” सदर विषयावर आंतरराष्ट्रीय वेबीनार संपन्न झाले. सदर वेबीनार साठी विविध १६ देशांमधून ११५० पेक्षा जास्त प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

वेबीनार यशस्वी करण्यासाठी साठी संस्थेचे जनरल सेक्रेटरी आदरणीय डॉ. प्रशांतदादा हिरे, संस्थेचे समन्वयक आदरणीय डॉ. अपूर्वभाऊ हिरे, संस्थेचे सहसचिव आदरणीय डॉ. व्ही. एस. मोरे, आणि आदरणीय डॉ. योगिताताई हिरे (चेअरमन, सी.डी.सी.) यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

वेबीनार साठी डॉ. डी. बी. धायगुडे (महाराष्ट्र), डॉ. पी. जी. सिद्धेश्वर(कर्नाटक), डॉ. आर. पी. देवरे (मुंबई विद्यापीठ), डॉ. हैदर अली बिस्वास (बांगलादेश), डॉ. पंकज कोइनकर (जपान), डॉ. हेमंत पांडे (उत्तराखंड), डॉ. खरात (सोलापूर विद्यापीठ) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले

सदर वेबीनारचे उद्घाटन डॉ. पंकज कोइनकर (जपान) यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी वेबीनार ची आवश्यकता स्पष्ट केली, तसेच संयोजक डॉ. ए. पी. भदाणे (गणित विभागप्रमुख) प्रास्ताविकाद्वारे वेबीनार चा उद्देश विशद केला. आभार प्रदर्शन डॉ. मृणाल भारद्वाज (आय. क्यू. ए. सी., चेअरमन) यांनी केले आणि सूत्रसंचालन डॉ. एस. डी. मांजरेकर यांनी केले. सदर वेबीनार च्या यशस्वीततेसाठी वृद्धी सोफ्ट्वेअर चे संचालक प्रा. उपेंद्र लाड, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एस. चोबे, डॉ. व्ही. रकिबे आणि डॉ. एस. डी. पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.